स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

# जनसंपर्क विभाग

जळगाव दि. १२ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही.एल.माहेश्वरी यांचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील यु.जी.सी. मानवसंसाधन विकास केंद्राच्या शैक्षणिक सल्लागार समितीचे सदस्य म्हणून नामनिर्देशन करण्यात आले आहे.

पुणे विद्यापीठाच्या कुलगुरूंनी हे नामनिर्देशन केले आहे. १९८७ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात या मानवसंसाधन विकास केंद्राची स्थापना केली असून या केंद्रामार्फत शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी, अधिकारी यांच्यासाठी प्रशिक्षण, क्षमतावाढीचे विविध कार्यक्रम घेण्यात येत असतात. प्रा. माहेश्वरी यांच्या अनुभवाचा आणि कौशल्याचा या केंद्राला फायदा व्हावा यासाठी मार्च २०२५ पर्यंत शैक्षणिक सल्लागार समिती सदस्य म्हणून नामनिर्देशन करण्यात आले आहे.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी